# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे

## माहिती व जनसंपर्क विभाग

महानगरपालिका मुख्य इमारत तळ मजला खोली क्र. ०७, काप आळी, स्व. आनंद दिघे चौक, भिवंडी ४२१३०२.

E-Mail :- pro.bncmc@gmail.com संपर्क क्र.:- ०२५२२-२५५३१४/३१५ विस्तार क्र. १०३


दिनांक - ०५/०६ /२०२५

**उद्यान/ वृक्षप्राधिकरण विभाग**

प्रसिद्धीसाठी

पर्यावरणाच्या दृष्टीने शासन धोरणानुसार मान्सून काळात २०२५ - २६ मध्ये जास्तीत जास्त झाडे लावणे धोरणानुसार ५ जुन २०२५ जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागामार्फत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्रातील अजवा हॉटेलच्या मागे, मिल्लत नगर रोड लगत नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानांत मा. अति-आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते तसेच मा. श्री. इमरान वली मोह. खान, माजी उपमहापौर, भिवंडी मनपा व मा. उपआयुक्त (उद्यान) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, मा. सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे, मा. सहाय्यक आयुक्त, श्री. नितीन पाटील, मा. सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) श्री. अजित महाडीक, मा. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ श्री. मकसुम शेख, श्री. वसिम शेख, उपअभियंता, मा. श्री. फैजल तातली, आरोग्य विभाग, श्रीकांत परदेशी, जनसंपर्क अधिकारी, भिवंडी मनपा व परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, आगाज महिला बचत गटाच्या महिला व मनपाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित वृक्षरोपणांचा शुभारंभ कार्यक्रम करण्यात आला.

सदर कार्यक्रम अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्रातील अजवा हॉटेलच्या मागे, मिल्लत नगर रोड लगत नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानांत कांचन, बहावा, अर्जन, जांभुळ, आंबा, बकुळ, रक्तचंदन इ. स्थानिक प्रजातीची-२०० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली असून, सदर ठिकाणावरील वृक्षलागवडीचे आगाज महिला बचत गट, भिवंडी AMRUT & DAY-NULM अंतर्गत वृक्षरोपणाचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. तसेच मनपाच्या प्रभाग क्र. २ कार्यक्षेत्रातील भादवड स्मशानभुमी आवरात उपलब्ध जागी मा. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ यांच्या शुभहस्ते व मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील वृक्षप्रेमी नागरीक यांच्या उपस्थितीत २०० बांबू वृक्षरोपांचे लागवड करण्यात आले असून, लागवड करण्यात आलेल्या वृक्षरोपांचे महानगरपालिकेमार्फत जतन व संवर्धन करण्यात येणार आहे.

प्रभाग समिती क्र. ३ कार्यक्षेत्रातील वऱ्हाळा तलाव उद्यान परिसरामध्ये महिला बचत गट यांच्या उपस्थितीत १०० झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेली असून, सदर झाडांचे जतन व संवर्धन महिला बचत गटाव्दारे करण्यात येणार आहे.

तसेच पर्यावरण दिनी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयासमोर उपलब्ध जागी मा. उपआयुक्त (मुख्या) श्री. विक्रम दराडे, मा. सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते व सुवर्ण जयंती विभाग प्रमुख श्री. कैलास पाटील, महिला बचत गट व AMRUT & DAY – NULM यांच्या उपस्थितीत १०० स्थानिक प्रजातीच्या झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेले असून, सदर झाडांचे जतन व संवर्धन महिला बचत गटाव्दारे करण्यात येणार असुन, मनपाच्या दिवानशहा दर्गा तलाव परिसरात गरीब नवाज फॉऊडेश (NGO) यांच्या उपस्थितीत स्थानिक प्रजातीची २०० झाडांचे वृक्षरोपण करण्यात आले असून, सदर वृक्षरोपणाचे जतन व संवर्धन गरीब नवाज फॉऊडेशन (NGO) यांचमार्फत करण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे ५ जुन २०२५ जागतिक पर्यावरण दिनी महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण- ८०० वृक्षरोपण करण्यात आले असून, मान्सून काळात वृक्षप्रेमी नागरीकांनी, सामाजिक संस्थेने

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे

## माहिती व जनसंपर्क विभाग

महानगरपालिका मुख्य इमारत तळ मजला खोली क्र. ०७, काप आळी, स्व. आनंद दिघे चौक, भिवंडी ४२१३०२.

E-Mail :- pro.bncmc@gmail.com संपर्क क्र.:- ०२५२२-२५५३१४/३१५ विस्तार क्र. १०३


जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे जतन व संवर्धन करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. अति- आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांनी कार्यक्रमस्थळी केले.

**(निलेश ना. संखे)**
**वृक्षअधिकारी तथा मुख्य उद्यान अधिक्षक**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**